## आजचे पंचांग

दिनांक : २० ऑगस्ट २०२६ वार : गुरुवार माह (अमावस्यांत) : श्रावण माह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : अष्टमी तिथी (रात्री ०९:१८ पर्यंत) त्यानंतर नवमी तिथी नक्षत्र : विशाखा नक्षत्र (सकाळी ०९:०७ पर्यंत) त्यानंतर अनुराधा नक्षत्र योग : इन्द्र योग (२१ ऑगस्ट पहाटे ०४:२४ पर्यंत) त्यानंतर वैधृति योग करण : विस्ती भद्रा करण (सकाळी ०८:१५ पर्यंत) त्यानंतर भाव करण

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


### दादांचा पूर्वीसारखा दरारा आता राहिलेला नाही

**पुणे :** ''बारामती पोरकी झाली आहे, अजित पवार मोठे नेते होते आणि त्यांची नाळ बारामतीकरांशी घट्ट जोडलेली होती. पुन्हा तसे दादा होणे आता शक्य नाही. बारामतीमध्ये सध्या गुन्हेगारी वाढली असून दादांचा पूर्वीसारखा दरारा आता राहिलेला नाही,'' असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते युगेंद्र पवार यांनी केले आहे. बारामती दौऱ्यावर असताना एका खासगी दुकानाच्या उद्घाटनप्रसंगी माध्यमांशी बोलताना त्यांनी सत्ताधाऱ्यांवर, विशेषतः खासदार सुनेत्रा पवार यांचे नाव न घेता जोरदार टीका केली.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरूवार, दि. २० ऑगस्ट २०२६ | वर्ष - १ | अंक - ३२२ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### समुद्राच्या मधोमध बोटीत अडकले ९ मच्छीमार; हेलिकॉप्टरच्या मदतीने भारतीय जवानांनी केली सुटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : वृत्तसंस्था**

दमण किनाऱ्याजवळ अरबी समुद्रात बुडणाऱ्या एका मासेमारी नौकेतील सर्व ९ मच्छिमारांचे प्राण वाचवण्यात भारतीय तटरक्षक दलाला यश आले आहे. तटरक्षक दलाच्या 'चेतक' हेलिकॉप्टरच्या साहाय्याने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हे आपत्कालीन बचाव कार्य यशस्वीरीत्या पार पाडण्यात आले.

**तातडीने बचाव मोहीम**

मिळालेल्या माहितीनुसार, समुद्रात मासेमारीसाठी गेलेली एक नाव तांत्रिक बिघाड किंवा पाणी शिरल्यामुळे अचानक बुडू लागली. जीवाला धोका निर्माण झाल्याचे लक्षात येताच मच्छिमारांनी तातडीने मदतीसाठी संदेश पाठवला. ही माहिती मिळताच दमण येथील तटरक्षक दलाच्या हवाई केंद्राने क्षणाचाही विलंब न करता तातडीने बचाव मोहिमेची आखणी केली.

**चेतक हेलिकॉप्टरने वेळेत गाठले घटनास्थळ**

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून दमण हवाई तळावरून भारतीय तटरक्षक दलाचे 'चेतक' हेलिकॉप्टर तात्काळ घटनास्थळाच्या दिशेने रवाना करण्यात आले. समुद्रात जहाजाची स्थिती ढासळत असताना आणि पाण्याचा धोका वाढलेला असताना, हेलिकॉप्टरच्या कुशल वैमानिकांनी अचूकतेने बचाव मोहीम राबवली.

**सर्व ९ मच्छिमार सुरक्षित; ३ जखमींवर उपचार सुरू**

तटरक्षक दलाच्या पथकाने जीवाची पर्वा न करता सर्व ९ मच्छिमारांना सुखरूपपणे हेलिकॉप्टरच्या सहाय्याने लिफ्ट करून बाहेर काढले. या मोहिमेत सर्व मच्छिमारांची सुरक्षितता प्राधान्याने सुनिश्चित करण्यात आली. बचाव करण्यात आलेल्या ९ जणांपैकी ३ मच्छीमार किरकोळ जखमी झाले होते. सर्व मच्छिमारांना दमण येथील तटरक्षक हवाई केंद्रावर आणल्यानंतर जखमींना तातडीने प्राथमिक उपचार देण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारांसाठी त्यांना स्थानिक सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तटरक्षक दलाच्या या तत्पर कारवाईमुळे समुद्रातील एक मोठा अपघात टळला असून सर्व ९ मच्छिमारांचे प्राण वाचले.

## सावरकरांच्या नावावर न्यायालयीन लढाई; संशोधकांची याचिका की भाजपच्या विचारधारेची अप्रत्यक्ष 'कव्हर फायर'?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

सावरकरांवरील विधानाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरोधात सुरू असलेल्या फौजदारी अब्रूनुकसानीच्या खटल्याने आता राजकीय आणि वैचारिक संघर्षाचे नवे वळण घेतले आहे. संशोधक डॉ. पंकज फडणवीस यांनी या खटल्याला स्थगिती देण्याची मागणी करत मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. मात्र, या याचिकेमुळे केवळ एका न्यायालयीन प्रकरणाचा प्रश्न उपस्थित होत नाही; सावरकर हा भारतीय जनता पक्षाच्या राजकीय विचारविश्वातील महत्त्वाचा प्रतीकात्मक आधार असल्याने या प्रकरणातून भाजपच्या संपूर्ण वैचारिक भूमिकेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची शक्यता आहे.

राहुल गांधी यांनी २०२३ मध्ये लंडन दौऱ्यात सावरकरांविषयी केलेल्या विधानावरून सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी पुण्यात अब्रूनुकसानीचा खटला दाखल केला आहे. या प्रकरणात न्यायालयीन प्रक्रिया सुरू असतानाच डॉ. फडणवीस यांनी असा दावा केला आहे की, न्यायालयाने सावरकर 'शूर होते की भ्याड' याचा ऐतिहासिक निकाल देण्याच्या दिशेने जाऊ नये. ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाच्या मूल्यमापनाचा प्रश्न हा न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राबाहेर असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

मात्र, या याचिकेकडे केवळ कायदेशीर हस्तक्षेप म्हणून पाहणे पुरेसे ठरणार नाही. कारण सावरकरांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांचा स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग हा गेल्या काही दशकांपासून भारतीय राजकारणातील तीव्र वैचारिक संघर्षाचा विषय आहे. भाजप आणि हिंदुत्ववादी राजकारणासाठी सावरकर हे महत्त्वाचे वैचारिक प्रतीक आहेत, तर काँग्रेससह विरोधकांकडून त्यांच्या राजकीय भूमिकेवर आणि ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या त्यांच्या रणनीतीवर प्रश्न उपस्थित केले जातात.

त्यामुळे राहुल गांधींविरोधातील खटला केवळ बदनामीचा कायदेशीर वाद न राहता इतिहासाच्या व्याख्येवरून सुरू असलेला राजकीय संघर्ष बनण्याची शक्यता आहे. न्यायालयीन प्रक्रियेत जर सावरकरांच्या ऐतिहासिक भूमिकेवर व्यापक चर्चा झाली, तर त्याचा परिणाम भाजपच्या त्या राजकीय कथनावर होऊ शकतो, ज्यामध्ये सावरकरांना राष्ट्रवादाच्या विशिष्ट वैचारिक परंपरेचे प्रतीक म्हणून मांडले जाते.

विशेष म्हणजे, पुणे न्यायालयाने १४ ऑगस्ट रोजी फडणवीस यांचा मध्यस्थी अर्ज 'अनावश्यक' ठरवून २० हजार दंडासह फेटाळल्याचे सांगितले जाते. त्यानंतर थेट उच्च न्यायालयात दाखल झालेली याचिका या प्रकरणाचे गांभीर्य वाढवते.

मात्र, 'भाजप संशोधकांच्या माध्यमातून न्यायालयीन लढाई लढवत आहे' असा निष्कर्ष सध्या ठोस पुराव्याशिवाय काढता येणार नाही. याचिकाकर्त्याची भूमिका स्वतंत्र आहे की तिच्यामागे कोणत्याही राजकीय संघटनेचे समर्थन आहे, हे न्यायालयीन नोंदी आणि उपलब्ध पुराव्यांतूनच स्पष्ट होईल. त्यामुळे राजकीय आरोप आणि सिद्ध झालेली वस्तुस्थिती यातील फरक राखणे आवश्यक आहे.

तरीही एक गोष्ट स्पष्ट आहेसावरकरांचा प्रश्न आता केवळ इतिहासाच्या पुस्तकात राहिलेला नाही. तो न्यायालय, संसद आणि राजकीय व्यासपीठावर पुन्हा पुन्हा येत आहे. राहुल गांधींवरील खटला पुढे जाताना सावरकरांच्या इतिहासाची चर्चा जितकी वाढेल, तितके भाजपच्या सावरकरकेंद्री वैचारिक राजकारणालाही अधिक कठोर प्रश्नांना सामोरे जावे लागू शकते.

## महागाई भत्ता वाढला, थकबाकीही मिळणार; पण सरकारी तिजोरीवर वाढता भार 'फ्रीबीज'च्या राजकारणात राज्याची आर्थिक कसरत किती दिवस?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

सरकारी कर्मचाऱ्यांसाठी वाढीव महागाई भत्त्याची घोषणा निश्चितच दिलासादायक आहे. सातव्या वेतन आयोगानुसार महागाई भत्ता ५८ टक्क्यांवरून ६० टक्के करण्यात आला असून जानेवारी ते जुलै २०२६ या सात महिन्यांची थकबाकी ऑगस्टच्या वेतनासोबत रोखीने देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठीही महागाई भत्ता २५७ टक्क्यांवरून २६२ टक्के करण्यात आला आहे. कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने ही आनंदाची बातमी असली, तरी राज्याच्या आर्थिक व्यवस्थेच्या दृष्टीने हा निर्णय एका मोठ्या प्रश्नाला जन्म देतोसरकारच्या वाढत्या आश्वासनांचा आणि सवलतींचा आर्थिक भार अखेर कितीपर्यंत पेलता येणार?

महागाई वाढत असताना कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता देणे ही शासनाची नियमित आणि आवश्यक प्रक्रिया आहे. त्यामुळे या निर्णयावर आक्षेप घेण्याचे कारण नाही. मात्र, एकीकडे कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्तीवेतन, महागाई भत्ता आणि विविध अनुदानांचा खर्च वाढत असताना दुसरीकडे लोकप्रिय घोषणांचा अक्षरशः पाऊस पडत आहे. प्रत्येक घटकाला काही ना काही सवलत देण्याच्या राजकीय स्पर्धेत राज्याच्या महसुली ताळेबंदावर किती ताण पडतो, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

'फ्रीबीज'चे राजकारण आता केवळ एखाद्या एका राज्यापुरते किंवा एका पक्षापुरते मर्यादित राहिलेले नाही. निवडणुकीपूर्वी मतदारांना आकर्षित करण्यासाठी मोफत योजना, रोख मदत, सवलती, अनुदाने आणि विविध आर्थिक लाभ जाहीर करण्याची स्पर्धाच निर्माण झाली आहे. या योजनांचा तात्कालिक राजकीय फायदा होऊ शकतो; परंतु त्यासाठी लागणारा पैसा सरकारच्या तिजोरीतूनच जातो. तिजोरी रिकामी झाली तर त्याची किंमत भविष्यात करदात्यांना, विकासकामांना आणि पुढच्या पिढ्यांना मोजावी लागू शकते.

राज्य सरकारच्या खर्चात पगार आणि निवृत्तीवेतनाचा मोठा वाटा आहे. त्यात महागाई भत्ता, विविध कल्याणकारी योजना आणि अनुदानांचा भार सातत्याने वाढत असेल, तर विकासासाठी उपलब्ध निधीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, सिंचन, सार्वजनिक वाहतूक आणि रोजगारनिर्मिती यांसारख्या दीर्घकालीन क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी सरकारकडे पुरेसा निधी राहणे आवश्यक आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काचा महागाई भत्ता देणे आणि गरजू नागरिकांसाठी कल्याणकारी योजना राबवणे यात विरोधाभास नाही. खरा प्रश्न आहे तो आर्थिक शिस्तीचा. कोणती योजना आवश्यक आहे, तिचा लाभ कोणाला मिळतो, त्यासाठी किती खर्च होतो आणि पुढील पाच-दहा वर्षांत त्याचा सरकारी तिजोरीवर किती भार पडणार आहे, याचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन होणे गरजेचे आहे. लोकप्रिय घोषणा करणे सोपे असते; त्यासाठी पैसा उभा करणे कठीण असते. सरकारकडे पैसा निर्माण करण्याची जादूची कांडी नसते. महसूल वाढवावा लागतो, करसंकलन सुधारावे लागते, अनुत्पादक खर्च कमी करावा लागतो आणि कर्जाचा वापर मर्यादित ठेवावा लागतो. अन्यथा आजची 'खुशखबर' उद्याच्या आर्थिक संकटाची पूर्वसूचना ठरू शकते. महागाई भत्ता वाढविण्याचा निर्णय कर्मचाऱ्यांसाठी स्वागतार्ह आहे. मात्र, त्याच वेळी सरकारने राज्याच्या वित्तीय आरोग्याबाबतही जनतेसमोर पारदर्शक चित्र मांडले पाहिजे. लोकप्रियता मिळवण्यासाठी तिजोरीवर भार टाकणे आणि आर्थिक शाश्वतता राखणे यातील संतुलन सरकारला साधावेच लागेल.

कारण शेवटी प्रश्न केवळ 'कुणाला किती मिळाले?' हा नाही; प्रश्न हा आहे की हे सगळे देण्यासाठी पैसा कुठून येणार आणि त्याची किंमत कोण मोजणार? आजच्या घोषणांचा आनंद साजरा करताना उद्याच्या आर्थिक जबाबदारीचा हिशेबही सरकारने ठेवला पाहिजे. अन्यथा 'कल्याणकारी राज्य' आणि 'आर्थिकदृष्ट्या ताणलेले राज्य' यातील रेषा कधी पुसली जाईल, हे कळणारही नाही.

### शिवसेना हा ठाकरेंचाच पक्ष, सुप्रिम कोर्टात ठणकावून सांगत सिब्बल यांनी युक्तिवादाच्या शेवटी केल्या दोन मोठ्या मागण्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान उद्धव ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांनी आपला युक्तिवाद आज संपवला आहे. सुमारे सात दिवस आमदारांच्या अपात्रतेपासून. पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने दिलेला निकाल, विधानसभा अध्यक्षांचे अधिकार, निवडणूक आयोगाचे अधिकार, शिवसेना कुणाची याबाबत अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडल्यानंतर कपिल सिब्बल यांनी शिवसेनेचं धनुष्यबाण हे पक्षचिन्ह ठाकरेंना मिळू शकत नसेल तर तो गोठवण्यात यावे, अशी महत्त्वपूर्ण मागणी केली आहे.

गेले सात दिवस चाललेला युक्तिवाद संपवताना अखेरीस कपिल सिब्बल म्हणाले की, मी या ठिकाणी किहोते प्रकरणातील दोन परिच्छेद वाचून दाखवू इच्छितो. पक्षांतर करणे हे पाप आहे. त्यामुळे पक्षांतराला थारा देण्यासाठी दहाव्या सूचीचे असे अर्थ काढू नका. कर्नाटकबाबतच्या निकालातही हेच म्हटलं आहे. तसेच शिवसेना हा ठाकरेंचा पक्ष आहे, शिवसेना ही शिंदेंची होऊ शकत नाही, शिंदेंनी तिचा फायदा घेतला, असा दावाही केला. यावेळी युक्तिवादाचा शेवट करताना शिवसेना पक्ष आणि चिन्ह याबाबत कपिल सिब्बल यांनी मोठी मागणी केली. सिब्बल म्हणाले की, शिवसेना हे नाव ठाकरे यांचेच आहे, असा निर्णय माननीय न्यायालयाने द्यावा. तसेच धनुष्यबाण हे चिन्ह शिंदेसेनेला मिळता कामा नये, असे आदेशही सर्वोच्च न्यायालयाने द्यावेत. शिंदेसेनेकडून धनुष्यबाणाचा ज्याप्रकारे वापर सुरू आहे, ते न्याय्य नाही. शिंदेसेनेकडून धनुष्यबाणाचा होत असलेला वापर हा बेकायदेशीर आहे. तसेच धनुष्यबाण हे चिन्ह जर शिंदेंना मिळू शकत नसेल आणि ठाकरेंनाही मिळू शकत नसेल तर ते चिन्ह गोठवले गेले पाहिजे, अशी मागणी करत कपिल सिब्बल यांनी आपला युक्तिवाद संपवला.

## ११,५८७ 'शेतकरी मित्र' निवडणार; मात्र महिन्याला १,५०० रुपयांत शेतीचा विकास कसा होणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यातील कृषीविस्तार यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी 'आत्मा' योजनेंतर्गत तब्बल ११ हजार ५८७ 'शेतकरी मित्र' निवडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गावपातळीवर कृषी विभाग आणि शेतकरी यांच्यातील दुवा म्हणून काम करण्याची जबाबदारी या शेतकरी मित्रांवर सोपविण्यात येणार आहे. उद्देश चांगला असला, तरी या संपूर्ण योजनेतील सर्वात मोठा प्रश्न आहे तो मानधनाचा दरमहा अवघे १,५०० रुपये!

शेतकऱ्यांना सरकारी योजनांची माहिती देणे, आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करणे, शेतकरी गटांची निर्मिती व क्षमता बांधणी करणे, शेतीशाळांसाठी लाभार्थी निवडणे, नैसर्गिक शेतीचा प्रचार करणे आणि प्रशिक्षणांचे आयोजन करण्यास मदत करणे, अशी अनेक जबाबदारी शेतकरी मित्रांवर टाकण्यात आली आहे. म्हणजेच गावातील कृषीविस्तार यंत्रणेचा महत्त्वाचा भार त्यांच्या खांद्यावर येणार आहे. मात्र, एवढ्या व्यापक कामासाठी महिन्याला १,५०० रुपये मानधन देणे कितपत न्याय्य आहे, हा प्रश्न उपस्थित होतो.

वर्षाला १८ हजार रुपये म्हणजे महिन्याला १,५०० रुपये. आजच्या महागाईच्या काळात मोबाईल, प्रवास, शेतकऱ्यांशी संपर्क, बैठकांचे आयोजन, माहिती पोहोचविणे आणि विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेण्यासाठी होणारा खर्च यामध्ये भागणार तरी कसा? सरकारला गावागावात कृषी तंत्रज्ञान पोहोचवायचे असेल, तर त्यासाठी काम करणाऱ्या व्यक्तीला किमान सन्मानजनक मोबदला देण्याची जबाबदारीही शासनाचीच आहे.

शेतकरी मित्र हा केवळ सरकारी योजना सांगणारा दूत नाही. तो प्रत्यक्ष शेतकऱ्यांमध्ये काम करणारा कार्यकर्ता असेल. एका गावातील शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेणे, कृषी विभागापर्यंत त्या पोहोचवणे, योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन करणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करणे, ही कामे वेळखाऊ आहेत. त्यासाठी केवळ मानधन जाहीर करून जबाबदारी संपत नाही.

विशेष म्हणजे अनुभवी, प्रयोगशील आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञान स्वीकारणाऱ्या शेतकऱ्यांची या पदासाठी निवड करण्यात येणार आहे. म्हणजे शासनाला गावातील प्रगतिशील आणि विश्वासार्ह शेतकरी आपल्या यंत्रणेसोबत जोडायचे आहेत. मग अशा अनुभवी व्यक्तीच्या ज्ञानाची आणि वेळेची किंमत महिन्याला १,५०० रुपये इतकीच आहे का, हा प्रश्न शासनाने स्वतः ला विचारण्याची गरज आहे.

राज्यातील शेतकरी अनेक संकटांशी झुंजत आहेत. हवामान बदल, अवकाळी पाऊस, बाजारभावातील चढ-उतार, उत्पादन खर्चात वाढ, कर्जाचा बोजा आणि सरकारी योजनांची गुंतागुंतीची प्रक्रिया यामुळे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शनाची गरज आहे. अशा परिस्थितीत गावपातळीवर सक्षम कृषी यंत्रणा उभी करणे निश्चितच स्वागतार्ह आहे. परंतु त्यासाठी नियुक्त होणाऱ्या शेतकरी मित्रांना पुरेसे प्रशिक्षण, प्रवासभत्ता, डिजिटल साधने आणि सन्मानजनक मानधन देणे तितकेच आवश्यक आहे.

शहरीकरण झालेल्या आणि लागवडीयोग्य क्षेत्र अत्यल्प असलेल्या भागात शेतकरी मित्रांची निवड केली जाणार नाही, हे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे उपलब्ध मनुष्यबळाचा वापर प्रत्यक्ष कृषी क्षेत्र असलेल्या गावांमध्ये करण्याचा शासनाचा प्रयत्न दिसतो. मात्र, योजनेचा खरा परिणाम कागदावरील ११,५८७ या संख्येवर नव्हे, तर शेतकऱ्यांना प्रत्यक्ष किती मदत मिळते यावर ठरणार आहे. सरकारला जर शेतकऱ्यांच्या दारापर्यंत योजना पोहोचवायच्या असतील, तर त्या दारापर्यंत जाणाऱ्या 'शेतकरी मित्रा'चा खर्चही सरकारनेच उचलला पाहिजे. महिन्याला १,५०० रुपये देऊन हजारो शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक शेती पोहोचविण्याचे स्वप्न पाहणे म्हणजे कमी खर्चात मोठा परिणाम साधण्याचा प्रयत्न आहे. पण शेतीच्या प्रश्नांवर 'स्वस्त' उपाय शोधून कृषी विकास साधता येईल का?

११,५८७ शेतकरी मित्रांची नियुक्ती हा निर्णय योग्य दिशेने टाकलेले पाऊल ठरू शकते. मात्र, त्यांना योग्य मोबदला, प्रशिक्षण आणि साधने मिळाली तरच हे पाऊल शेतकऱ्यांच्या हिताचे ठरेल. अन्यथा 'शेतकरी मित्र' हे नाव मोठे आणि मानधन मात्र तुटपुंजेअशी विसंगती निर्माण होण्याची शक्यता आहे.

## न्यायव्यवस्थेतील कर्मचाऱ्यांनाही 'समान वेतना'ची प्रतीक्षा; सरकारच्या उदासीनतेविरोधात आता एल्गार!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. न्याय देणाऱ्या व्यवस्थेचा कणा असलेले कर्मचारीच जर आपल्या हक्काच्या वेतनासाठी वर्षानुवर्षे शासनाच्या दारात उभे राहत असतील, तर राज्याच्या कारभाराची दिशा नेमकी कोणत्या दिशेने चालली आहे, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. 'चांगले सरकार' असल्याचा दावा करणाऱ्या शासनाच्या यादीत आता न्यायालयीन कर्मचारीही प्रतीक्षेतच असल्याचे चित्र आहे.

मुंबई उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या वेतनाच्या धर्तीवर दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही समान वेतन मिळावे, ही मागणी गेल्या काही वर्षांपासून करण्यात येत आहे. निवेदने, विनंत्या आणि सातत्याने केलेला पाठपुरावा यानंतरही शासनाकडून अपेक्षित निर्णय झालेला नाही. विशेष म्हणजे, या प्रश्नावर उच्च न्यायालयाने राज्य शासनाला जानेवारी २०२५ मध्ये अहवाल सादर करण्याचे आदेश दिल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. मात्र, अद्यापही तो अहवाल सादर झालेला नसल्याने शासनाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

प्रश्न केवळ वेतनवाढीचा नाही. समान कामासाठी समान वेतन, सेवा अटींमध्ये समानता आणि कर्मचाऱ्यांच्या श्रमाला योग्य मोबदला हा त्यांच्या अधिकाराचा विषय आहे. न्यायालयीन यंत्रणा सुरळीत चालविण्यात लिपिक, शिपाई, बेलिफ, स्टेनोग्राफर, सहायक अधीक्षक, अधीक्षक यांसह असंख्य कर्मचारी महत्त्वाची भूमिका बजावतात. न्यायालयीन कामकाजातील प्रत्येक टप्प्यावर त्यांचा सहभाग असतो. मात्र, याच व्यवस्थेतील कर्मचाऱ्यांना आपल्या वेतनाच्या प्रश्नासाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत असेल, तर ही व्यवस्थेची शोकांतिका म्हणावी लागेल.

आता कर्मचाऱ्यांनीही शासनाच्या दुर्लक्षाविरोधात निर्णायक लढ्याची तयारी केली आहे. बेलिफ कर्मचारी महासंघ, स्टेनोग्राफर असोसिएशन, गट 'ड' कर्मचारी महासंघ आणि कर्मचारी महासंघ गट 'क' यांसह विविध संघटना एकत्र आल्या आहेत. काही वकिलांनीही या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला आहे. 'न्यायालयीन कर्मचारीच न्यायापासून वंचित' असल्याची भावना व्यक्त होत आहे.

आंदोलनाची टप्प्याटप्प्याने आखणी करण्यात आली आहे. ६ सप्टेंबर रोजी काळ्या फिती लावून काम करण्यात येणार आहे. त्यानंतर १६ आणि १७ ऑक्टोबर रोजी सलग दोन दिवस काळ्या फिती लावून निषेध नोंदविला जाईल. ५ नोव्हेंबर रोजी सामूहिक रजा देण्यात येणार असून, शासनाने तरीही दखल घेतली नाही तर १६ नोव्हेंबरपासून बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

ही परिस्थिती शासनासाठी केवळ कर्मचारी आंदोलन म्हणून पाहण्याची वेळ राहिलेली नाही. न्यायालयीन कामकाज ठप्प झाल्यास त्याचा थेट परिणाम सर्वसामान्य नागरिकांच्या न्यायप्राप्तीवर होणार आहे. हजारो प्रकरणे आधीच प्रलंबित असताना न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा असंतोष दुर्लक्षित करणे म्हणजे न्यायव्यवस्थेवरील ताण आणखी वाढविणे होय.

'समान वेतन' ही मागणी अवाजवी नाही. उलट, ती न्यायाच्या मूलभूत तत्त्वाशी जोडलेली आहे. न्याय देणाऱ्या संस्थेतील कर्मचाऱ्यांना न्याय मिळण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागणे, ही सरकारसाठी आत्मपरीक्षणाची वेळ आहे. प्रश्न आता ३४ हजार कर्मचाऱ्यांचा असला, तरी त्यामागे राज्याच्या न्यायव्यवस्थेची कार्यक्षमता आणि सर्वसामान्यांच्या न्यायाच्या हक्काचा प्रश्न उभा आहे.

सरकारने आंदोलन तीव्र होण्याची वाट न पाहता तातडीने संवाद साधावा, प्रलंबित अहवाल सादर करावा आणि समान वेतनाच्या मागणीवर ठोस निर्णय घ्यावा. अन्यथा 'चांगले सरकार' या घोषणेचा अर्थ केवळ जाहिरातीपुरता उरण्याचा धोका आहे. न्यायालयीन कर्मचारी आता प्रतीक्षा करण्याच्या मनःस्थितीत नाहीत; त्यांनी एल्गार पुकारला आहे.

## संपादकीय

### पोलिसांच्या आदेशाआड भाजपचा 'सावलीतला' हस्तक्षेप?

राहुल गांधी यांच्या २२ ऑगस्ट रोजी पुण्यातील एआयएसएसएमएस कॉलेजच्या मैदानावर नियोजित 'छात्रों की गूंज' कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी १८ ते ३१ ऑगस्टदरम्यान सार्वजनिक मेळावे, सभा आणि मिरवणुकांवर निर्बंध लागू केले आहेत. प्रशासनाच्या दृष्टीने हा निर्णय कायदा-सुव्यवस्था आणि सुरक्षेच्या कारणास्तव घेतलेला प्रतिबंधात्मक आदेश असला, तरी या आदेशाच्या वेळेमुळे राजकीय वर्तुळात अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. विशेषतः राहुल गांधींचा कार्यक्रम जवळ आला असतानाच हा आदेश का? आणि या निर्णयामागे भाजपचा काही राजकीय दबाव आहे का? हा प्रश्न आता चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

पोलिसांनी लागू केलेल्या आदेशानुसार, पूर्वपरवानगीशिवाय पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींच्या अनधिकृत सभा, सार्वजनिक बैठका आणि मिरवणुकांवर निर्बंध आहेत. मात्र, अधिकृत परवानगी घेऊन कार्यक्रम आयोजित करता येतील, अशी प्रशासनाची भूमिका आहे. त्यामुळे आदेश हा सर्वसमावेशक असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. तरीही त्याचा सर्वाधिक राजकीय परिणाम राहुल गांधींच्या कार्यक्रमावरच का दिसतो, हा विरोधकांचा सवाल आहे.

काँग्रेसने या आदेशाच्या वेळेवर तीव्र आक्षेप घेतला आहे. पक्षाच्या नेत्यांनी याला युवकांच्या प्रश्नांवर चर्चा करणाऱ्या कार्यक्रमाला अडथळा आणण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप केला आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पवन खेरा यांनीही या घडामोडींवर प्रश्न उपस्थित करत देशातील इतर शहरांमध्ये विद्यार्थी संपर्क कार्यक्रमांना आलेल्या अडचणींचा संदर्भ दिला आहे.

येथेच 'भाजप सक्रिय आहे का?' हा प्रश्न उपस्थित होतो. पोलिस प्रशासनावर थेट राजकीय दबाव आणला गेला, याचा सार्वजनिकरीत्या ठोस पुरावा समोर आलेला नसला, तरी राजकीय कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर लागू झालेल्या निर्बंधांमुळे संशयाला वाव मिळतो. लोकशाहीमध्ये संशय निर्माण होणेही गंभीर बाब असते. कारण प्रशासनाचा निर्णय कायदेशीर असला, तरी त्यामागची वेळ, प्रक्रिया आणि त्याचा राजकीय परिणाम याबाबत पारदर्शकता असणे आवश्यक आहे. भाजपने जर या निर्णयामागे कोणतीही भूमिका घेतलेली नसेल, तर सरकार आणि प्रशासनाने ती भूमिका स्पष्टपणे जनतेसमोर मांडायला हवी. उलट, जर प्रशासनाच्या निर्णयावर कोणताही राजकीय प्रभाव नसल्याचे सांगितले जात असेल, तर मग राहुल गांधींच्या कार्यक्रमाच्या आधीच निर्बंध लागू करण्यामागील ठोस सुरक्षा कारणेही सार्वजनिक केली पाहिजेत. लोकशाहीत प्रश्न विचारणे म्हणजे प्रशासनाला अडथळा आणणे नव्हे.

दरम्यान, कार्यक्रमाच्या स्वरूपातही बदल करण्यात आला आहे. राहुल गांधींचा पुणे दौरा महिलांसाठी केंद्रित करण्यात आल्याचे सांगितले जात असून, प्रश्नपत्रिका फुटीचा मुद्दा, शिक्षणव्यवस्था आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसारख्या प्रश्नांवर चर्चा होणार आहे. म्हणजेच कार्यक्रमाचा केंद्रबिंदू राजकीय शक्तिप्रदर्शनापेक्षा विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर राहण्याचा प्रयत्न दिसतो.

महत्त्वाचे म्हणजे स्थानिक काँग्रेस नेत्यांनी पोलिस आयुक्तांसोबत समन्वय बैठका झाल्याचे सांगितले असून, एआयएसएसएमएस कॉलेजच्या मैदानावर आवश्यक सुरक्षा मंजुरीसह तयारी पुढे सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत कार्यक्रम पूर्णपणे रोखण्यात आलेला नाही. मात्र, त्याचवेळी प्रतिबंधात्मक आदेश कायम असल्याने शेवटच्या क्षणापर्यंत अनिश्चिततेची छाया राहणार आहे.

राजकारणात योगायोग आणि राजकीय हस्तक्षेप यांच्यातील सीमारेषा अनेकदा अस्पष्ट असते. त्यामुळे 'भाजपचा पोलिस प्रशासनावर दबाव आहे' असा निष्कर्ष पुराव्याशिवाय काढणे योग्य ठरणार नाही. पण भाजपचा हात नाही, हे सिद्ध करण्याची जबाबदारीही सत्ताधाऱ्यांचीच आहे, कारण लोकशाहीतील प्रशासन जितके निष्पक्ष दिसते तितकाच जनतेचा त्यावर विश्वास वाढतो. राहुल गांधींच्या कार्यक्रमाला सुरक्षा देणे ही पोलिसांची जबाबदारी आहे; कार्यक्रम रोखणे नव्हे. त्याचप्रमाणे राजकीय पक्षांनीही सुरक्षा नियमांचे पालन करणे अपेक्षित आहे. मात्र, विद्यार्थी, महिला आणि शिक्षणाच्या प्रश्नांवर चर्चा करणाऱ्या कार्यक्रमाला परवानग्यांच्या भूलभुलैय्यात अडकवले जात असेल, तर तो केवळ एका पक्षाचा प्रश्न राहत नाहीतो लोकशाहीतील अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न बनतो. : पुणे पोलिसांचा आदेश हा केवळ सुरक्षा उपाय आहे, की सत्तेच्या राजकारणाची सावली प्रशासनावर पडली आहे? उत्तर प्रशासनाने द्यायचे आहेआणि तेही स्पष्टपणे.

# शिवसेनेच्या वतीने ३० ऑगस्टला भव्य रोजगार मेळावा; दिव्यांग बांधवांनाही रोजगाराच्या संधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी



मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेच्या वतीने रविवारी (दि. ३० ऑगस्ट) भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. चिंचवड गावातील चिंचवडे लॉन्स येथे सकाळी ९ वाजता या मेळाव्याचे उद्घाटन होणार असल्याची माहिती शिवसेना उपनेत्या व ज्येष्ठ नगरसेविका सुलभाताई उबाळे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, समन्वयक किरण राहणे, दीपक पवार आदी उपस्थित होते.

या रोजगार मेळाव्यात बँकिंग, आयटी, बीपीओ, केपीओ, रिअल इस्टेट, मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमोबाईल आणि टेक्नॉलॉजी यांसह विविध क्षेत्रांतील कंपन्या व उद्योग प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. विविध शैक्षणिक पात्रता आणि कौशल्य असलेल्या उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे सुलभा उबाळे यांनी सांगितले.

विश्वजीत बारणे यांनी सांगितले की, ॲक्सिस बँक, आयसीआयसीआय बँक, टाटा मोटर्स, हुडास टेक्नॉलॉजी, विगल स्पेस, बजाज, ह्युंदाई, डॉ. रेड्डी फाउंडेशन, बीव्हीजी इंडिया यांसारख्या नामांकित आस्थापनांचे प्रतिनिधी मेळाव्यात उपस्थित राहून उमेदवारांच्या मुलाखती घेणार आहेत.

पाचवी उत्तीर्ण उमेदवारांपासून आयटीआय, डिप्लोमा, पदवीधर, इंजिनिअरिंग तसेच इतर उच्चशिक्षित उमेदवारांपर्यंत सर्वांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि कौशल्यानुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच दिव्यांग बांधवांसाठीही रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

नोकरी न मिळालेल्यांना 'खासदार शिवसेना जॉब कार्ड'

मेळाव्याच्या दिवशी थेट नोकरी मिळू न शकलेल्या उमेदवारांना 'खासदार शिवसेना जॉब कार्ड' देण्यात येणार आहे. या माध्यमातून उमेदवारांची माहिती संकलित करून भविष्यात त्यांच्या पात्रतेनुसार उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यामुळे मेळाव्यानंतरही उमेदवारांना रोजगाराच्या संधींशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

महिलांसाठी स्वयंरोजगाराचे मार्गदर्शन

महिलांसाठी स्वयंरोजगार, उद्योजकता, कौशल्य विकास आणि व्यवसायाच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन व प्रशिक्षणाची व्यवस्थाही करण्यात आली आहे. महिलांना नोकरीसोबतच स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी आवश्यक माहिती देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# पीसीसीओई मध्ये शुक्रवारी आयईईई आयसीसीयूबीईए आंतरराष्ट्रीय परिषद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांच्या वतीने दहावी आयईईई इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन कम्प्युटिंग, कम्युनिकेशन, कंट्रोल अँड ऑटोमेशन या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवारी, (दि.२१) सकाळी १० वाजता, परिषदेचे उद्घाटन बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स, पिलानीचे कुलगुरू डॉ. व्ही. रामगोपाल राव यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी स्पेस एप्लीकेशन्स सेंटर, अहमदाबादचे माजी संचालक डॉ. निलेश देसाई, आयईईई पुणे सेक्शनचे प्रतिनिधी डॉ. मंदार भवाळकर आदी उपस्थित राहणार आहेत.

या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी आणि उपसंचालक डॉ. नीलकंठ चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. या दोन दिवसीय परिषदेची 'टेक फॉर गुड : बिल्डिंग अ बेटर डिजिटल वर्ल्ड' ही मध्यवर्ती संकल्पना आहे. परिषदेला आयईईई पुणे सेक्शनचे तांत्रिक प्रायोजकत्व आहे. संशोधन निबंधांचे सादरीकरण, तज्ज्ञांची कीनोट व्याख्याने आणि ज्ञानाची देवाणघेवाण होणार आहे. डॉ. अर्चना शर्मा आणि डॉ. श्रीनिवास कुलकर्णी यांचे व्याख्यान होणार आहे. उत्कृष्ट संशोधनासाठी 'बेस्ट पेपर अवॉर्ड' प्रदान करण्यात येणार आहे. समारोप केंद्रीय मंत्रालय इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी वरिष्ठ अधिकारी डॉ. सुधीर कुमार मारवा यांच्या उपस्थितीत होणार आहे. पीसीसीओईच्या माध्यमातून जागतिक दर्जाच्या संशोधनाला व्यासपीठ उपलब्ध करून देणे, विद्यार्थी, संशोधक, शैक्षणिक संस्था आणि उद्योग क्षेत्रातील सहकार्याला चालना देणे तसेच भारताच्या संशोधन क्षमतेला जागतिक व्यासपीठाशी जोडणे, हा या परिषदेचा प्रमुख उद्देश आहे.

# 'ऑटोमोबाइल हब'ची वाहतूक व्यवस्था कोलमडली; चाकणचा विकास की अव्यवस्थेचा विस्तार ?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चाकण औद्योगिक क्षेत्रात हजारो कोटी रुपयांची उलाढाल होत असून मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती झाली आहे. राज्याच्या तिजोरीत कोट्यवधी रुपयांचा महसूल देणाऱ्या या उद्योगनगरीसमोर मात्र पायाभूत सुविधांचा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. रस्ते, वाहतूक कोंडी, खड्डे, अपुऱ्या मूलभूत सुविधा, विविध परवानग्यांची किचकट प्रक्रिया, कामगारांसाठी आरोग्य सुविधा आणि घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नांमुळे उद्योगविश्वात नाराजी व्यक्त होत आहे. उद्योगांचा विस्तार ज्या वेगाने होत आहे, त्याच वेगाने सुविधा वाढविण्याची गरज आहे.

तळेगाव-चाकण-शिक्रापूर हा महत्त्वाचा औद्योगिक मार्ग असून त्याच्या देखभालीसाठी ५९ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध असल्याचे सांगितले जाते. पुणे, नगर, नाशिक तसेच राज्यातील विविध औद्योगिक पट्ट्यांना जोडणाऱ्या या मार्गावर दररोज हजारो अवजड वाहने, मालवाहू ट्रक आणि कामगारांची वाहतूक होते. त्यामुळे या मार्गाची दर्जेदार आणि वेळेत देखभाल होणे अत्यावश्यक आहे. पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोंडी आणि अपुऱ्या रस्ते सुविधांचाही प्रश्न अनेक वर्षांपासून कायम आहे. माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पहाटे या मार्गाची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर चौकांचे रुंदीकरण आणि अन्य आवश्यक कामांसाठी सुमारे ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. निधीची तरतूद होत असली, तरी त्याचा प्रत्यक्ष परिणाम रस्त्यावर दिसणे गरजेचे आहे.

केवळ निधी उपलब्ध करून प्रश्न सुटणार नाही. रस्त्यांची दर्जेदार दुरुस्ती, खड्ड्यांची कायमस्वरूपी विल्हेवाट, चौकांचे शास्त्रीय नियोजन, वाहतूक व्यवस्थापन आणि अवजड वाहनांसाठी स्वतंत्र नियोजन यावरही प्रशासनाने गांभीर्याने काम करण्याची गरज आहे. चाकण औद्योगिक क्षेत्रात नवीन उद्योग सुरू करण्यासाठी उद्योजकांना विविध शासकीय विभागांच्या परवानग्यांसाठी मोठी धावपळ करावी लागत असल्याची तक्रार आहे. कंपनी नोंदणी, पॅनकार्ड, जीएसटी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मंजुरी, विविध परवाने, कामगारांशी संबंधित परवानग्या, वैद्यकीय सुविधा तसेच महिला कामगारांसाठी आवश्यक सुविधांची पूर्तता करताना अनेक कार्यालयांशी संपर्क साधावा लागतो.

# 'उद्धव श्री पुरस्कार २०२६'चे शुक्रवारी वितरण; संजय राऊत, विनायक राऊत यांच्या हस्ते होणार सन्मान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी-चिंचवड शहर शिवसेनेच्या वतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी 'उद्धव श्री पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येते. यंदाच्या 'उद्धव श्री पुरस्कार २०२६'चे वितरण राज्यसभा खासदार संजय राऊत आणि माजी खासदार विनायक राऊत यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २१ ऑगस्ट) करण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पिंपरी-चिंचवड शहरप्रमुख चेतन पवार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.




शुक्रवारी सायंकाळी ४ वाजता ताथवडे बीआरटी रोड येथील सुखवाणी फार्म, नरसिंह मंदिराजवळ पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी शिवसेना उपनेत्या विशाखाताई राऊत, महाराष्ट्र संघटिका रंजनाताई नेवाळकर, पुणे शहर शिवसेना प्रमुख वसंत मोरे, पुणे शहराचे माजी प्रमुख संजय मोरे, मावळ तालुका प्रमुख आशिष ठोंबरे, पुणे शहर संपर्क संघटिका मेघना काकडे माने, पिंपरी-चिंचवड संपर्कप्रमुख लतिकाताई पाष्टे तसेच गजानन थरकुडे, विजय सुळे, सुनील सावंत आदी प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत.

विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा गौरव

यंदाचा 'उद्धव श्री पुरस्कार २०२६' वैद्यकीय, साहित्य, कामगार, सामाजिक, क्रीडा, कृषी आणि कला क्षेत्रातील मान्यवरांना जाहीर करण्यात आला आहे.

पुरस्कारार्थींमध्ये डॉ. संतोष लाटकर आणि डॉ. रोहन काटे (वैद्यकीय), प्रा. तुकाराम पाटील (साहित्य), काशिनाथ नखाते (कामगार), प्रीती वैद्य व भाग्यश्री मोरे (सामाजिक), चांद पाशा अहमद हुसेन तांबोळी व पै. योगेश्वर तापकीर (क्रीडा), रामदास काटे (कृषी) आणि डॉ. संजीव कुमार पाटील (कला) यांचा समावेश आहे.

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या या मान्यवरांचा पुरस्कार सोहळ्यात सन्मान करण्यात येणार असल्याचे चेतन पवार यांनी सांगितले.

# सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या सुधारीत शुल्क रचनेमुळे विद्यार्थ्यांना मिळणार परताव्याचा लाभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी चिंचवड : प्रतिनिधी

सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ प्रशासनाने जाहीर केलेल्या शुल्क रचने संदर्भात विविध क्षेत्रातून आणि विद्यार्थ्यांकडून निवेदन प्राप्त झाले होते. सदर विषयासंदर्भात विद्यार्थ्यांच्या मागणीप्रती असलेली संवेदनशीलता आणि उच्च व तंत्र शिक्षण सर्वसामान्य विद्यार्थ्यांपर्यंत पोचवण्याची शासनाची भूमिका लक्षात घेऊन मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्या दालनात मा. अपर सचिव श्री. रेड्डी आणि इतर वरिष्ठ पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत काल मंगळवार दिनांक १८ ऑगस्ट २०२६ रोजी सविस्तर चर्चा करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या या मागणीला अतिशय सकारात्मक प्रतिसाद म्हणून या शैक्षणिक वर्षासाठी सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठात प्रवेशासाठी जाहीर केलेल्या सर्व शुल्क रचनेची फेररचना करावी, असे निर्देश मा. मंत्री महोदयांनी दिले.

विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या परताव्याचा अधिकाधिक लाभ मिळावा, या उद्देशाने विद्यापीठाने शुल्क नियामक प्राधिकरणाच्या (एफआरए) मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी सुधारीत शुल्क रचना करावी, असे मार्गदर्शित व निर्देशित केले. (एफआरए) मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि मा. मंत्री महोदयांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार शुल्क रचनेतील इतर शुल्क (Other Fee) हे शैक्षणिक शुल्कात (Tuition fees) समाविष्ट करावे, असे निर्देशित केले आहे.

या सुधारीत शुल्क रचनेमुळे इतर मागासवर्गीय (OBC), विमुक्त जाती व भटक्या जमाती (तग/छद्द), ईडब्ल्यूएस (EWS) तसेच एसईबीसी (SEBC) प्रवर्गातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना (Girls students) शासनाकडून मिळणाऱ्या शिक्षण शुल्क परताव्याचा अधिकाधिक लाभ मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने सकारात्मक निर्णय घेण्यासाठी योग्य मार्गदर्शन केल्याबद्दल सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या प्रशासनाने राज्य शासनाचे आभार मानले आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### सहकारनगरात स्पाच्या नावाखाली वेश्या व्यवसाय; ५ महिलांची सुटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

सहकारनगर परिसरातील स्पा सेंटरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्या व्यवसायाचा गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक व व्यापार प्रतिबंध कक्षाने पर्दाफाश केला. पोलिसांनी केलेल्या कारवाईत पाच पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून, स्पा सेंटर चालवणाऱ्याला अटक करण्यात आली आहे. आप्पा दशरथ फसले (वय ४८, रा. कृष्णकुंज सोसायटी, साळवे गार्डन जवळ, अपर इंदिरानगर) असे आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सहकारनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत 'ऊर्जा स्पा' या नावाने स्पा सेंटर सुरू असून, तेथे महिलांकडून वेश्या व्यवसाय करून घेतला जात असल्याची गोपनीय माहिती गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक व व्यापार प्रतिबंध कक्षाला मिळाली होती. त्यानुसार पोलिस निरीक्षक आशालता खापरे यांच्या मार्गदर्शनाखाली माहितीची पडताळणी करण्यात आली. बनावट ग्राहकाच्या माध्यमातून माहितीची खात्री केल्यानंतर पोलिसांनी संबंधित ठिकाणी अचानक छापा टाकला. या कारवाईत वेश्या व्यवसायासाठी आणलेल्या पाच महिलांची सुटका करण्यात आली. तसेच स्पा सेंटर चालवणाऱ्या अप्पा फसले याला अटक करण्यात आली. याप्रकरणी सहकारनगर पोलिस ठाण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# निकोप नागरी समाजासाठी ग्रंथालय, टाऊन हॉल आणि क्लब आवश्यक : डॉ. सदानंद मोरे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

शिरूर । प्रतिनिधी

निकोप आणि सुदृढ नागरी समाजाच्या निर्मितीसाठी शहरात ग्रंथालय, टाऊन हॉल आणि विविध प्रकारचे क्लब असणे आवश्यक आहे. अशा संस्थांच्या माध्यमातून नागरिकांना परस्पर संवाद साधता येतो, नवे विचार समजून घेता येतात आणि सामाजिक जीवन अधिक समृद्ध होते. शिरूरमध्ये सनशाईन सॅटर्डे क्लबच्या माध्यमातून विचार आणि संवादाचा जागर सुरू आहे, ही कौतुकास्पद बाब आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

शिरूर येथील सनशाईन सॅटर्डे क्लबच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष तथा क्लबचे अध्यक्ष किशोर राजे निंबाळकर, न्यायाधीश प्रितेश भंडारी, पोलीस उपअधीक्षक अनिल कटके, पोलीस निरीक्षक विनोद पाटील, नगराध्यक्ष ऐश्वर्या पाचर्णे, शिरूर नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा समितीच्या सभापती डॉ. सुनीता पोटे, मुख्याध्यापिका ज्योती मुळे, मावळाई प्रकाशनचे डॉ. सुभाष गवारी, प्रा. डॉ. दीपक गायकवाड, उद्योजक प्रकाश कुतवळ, राजीव फराटे आदी उपस्थित होते.

डॉ. मोरे यांनी आपल्या व्याख्यानात ब्रिटिश काळापासून भारतीय नागरी समाजात झालेल्या परिवर्तनाचा आढावा घेतला. शिक्षण, प्रसारमाध्यमे, ग्रंथालये, विविध संस्था आणि संवादाची व्यासपीठे यांमुळे समाजातील बदलांना चालना मिळाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सुजाण, जागरूक आणि सुशिक्षित नागरिकांसोबतच साहित्य, कला आणि वाचनाची अभिरुची असलेला समाज नागरी विकासासाठी महत्त्वाचा ठरतो, असे त्यांनी सांगितले.

१८३२ मध्ये बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू केले. त्यानंतर मराठी ग्रंथांच्या मुद्रणाला चालना मिळाली. १८४५ मध्ये ज्ञानेश्वरीचे मुद्रण झाले. पुढे पाश्चात्त्य शिक्षण, विज्ञान, धर्म आणि विविध संस्था भारतात आल्या. त्यामुळे समाजातील संवादाची व्याप्ती वाढत गेली, असे डॉ. मोरे यांनी नमूद केले.

मुंबई आणि पुण्यासारख्या शहरांमध्ये टाऊन हॉलची निर्मिती झाली. संवाद म्हणजे केवळ आपले म्हणणे मांडणे नव्हे, तर समोरच्याचे म्हणणे ऐकून घेणेही महत्त्वाचे आहे. त्यामुळे निकोप समाजनिर्मितीसाठी टाऊन हॉल, ग्रंथालये आणि क्लब यांसारखी संस्थात्मक व्यासपीठे आवश्यक आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

एकमेकांना भेटणे, संवाद साधणे, चर्चा करणे आणि नवीन गोष्टी जाणून घेणे यासाठी क्लब हे प्रभावी माध्यम आहे. शिरूर शहराची ही गरज ओळखून किशोर राजे निंबाळकर यांनी पुढाकार घेऊन सनशाईन सॅटर्डे क्लबची स्थापना केली. या माध्यमातून विचार आणि संवादाची संस्कृती रुजविण्याचे काम सुरू असल्याबद्दल डॉ. मोरे यांनी क्लबचे कौतुक केले.

साहित्य, कला, अनुभव आणि विविध क्षेत्रांतील व्यक्तींशी होणारा संवाद यामुळे माणसाच्या विचारांचे क्षितिज विस्तारते. त्यामुळे नागरिकांच्या संपर्कात विविध क्षेत्रांतील व्यक्ती येणे आणि त्यांच्याशी विचारांची देवाणघेवाण होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

**कृत्रिम बुद्धिमत्ता साधन, मानवी बुद्धीला पर्याय नव्हे**

सध्याचा समाज हा तरुणांचा आणि तंत्रज्ञानाने प्रभावित झालेला समाज आहे. तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनात मोठे परिवर्तन होत असून त्याचा वेग हे मोठे आव्हान आहे. माणसाने यंत्रांची निर्मिती आपल्या श्रमांची आणि इंद्रियांची क्षमता वाढवण्यासाठी केली. त्याचप्रमाणे कृत्रिम बुद्धिमत्ता मानवी बुद्धीची शक्ती वाढविण्यासाठी उपयोगी ठरू शकते; मात्र ती मानवी बुद्धिमत्तेला पर्याय होऊ शकत नाही, असे डॉ. मोरे यांनी स्पष्ट केले.

लहान मुलांमध्ये नैसर्गिक बुद्धिमत्तेचा पुरेसा विकास होण्यापूर्वी कृत्रिम बुद्धिमत्तेचा अतिरेकी वापर वाढणे चिंताजनक आहे. विद्यार्थ्यांना लहान वयातच प्रत्येक गोष्टीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर अवलंबून ठेवणे त्यांच्या स्वतंत्र विचारक्षमतेच्या विकासाला बाधक ठरू शकते. त्यामुळे मुलांच्या नैसर्गिक बुद्धिमत्तेचा योग्य स्तरावर विकास झाल्यानंतरच कृत्रिम बुद्धिमत्तेचा सजग वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले.

तंत्रज्ञानाला विरोध करण्याची गरज नाही; मात्र तंत्रज्ञान हे माणसाने निर्माण केलेले साधन आहे, याचे भान ठेवले पाहिजे. तंत्रज्ञान आपल्या डोक्यावर स्वार होऊ नये, तर त्याचा विवेकाने आणि सजगपणे उपयोग झाला पाहिजे. माणुसकी आणि सामाजिकता जपणे हीच काळाची गरज असल्याचेही डॉ. मोरे यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्लबचे अध्यक्ष किशोर राजे निंबाळकर यांनी केले. गेल्या दोन वर्षांत क्लबच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा त्या.

## भाजप कायदा आघाडीचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर : प्रतिनिधी

जन्म-मृत्यू नोंदणीची दोन ते तीन वर्षांपासून प्रलंबित असलेली प्रकरणे तातडीने निकाली काढून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी भारतीय जनता पक्षाच्या कायदा आघाडीचे उत्तर पुणे जिल्हाध्यक्ष श्रीराम सूर्यकांत बांगर पाटील यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मंचर-जुन्नरच्या उपविभागीय अधिकारी अर्चना तांबे यांना निवेदन दिले.

केंद्र सरकारने जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मध्ये सुधारणा केली असून, दोन वर्षांच्या आतील प्रलंबित प्रकरणांवर जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी तसेच कार्यकारी दंडाधिकारी यांना निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. मात्र, या सुधारणेच्या अंमलबजावणीसंदर्भात राजपत्राद्वारे निश्चित तारीख अद्याप जाहीर झालेली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, जन्म-मृत्यू नोंदणीची अनेक प्रकरणे मागील दोन ते तीन वर्षांपासून प्रलंबित असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. आवश्यक कागदपत्रे मिळविण्यासाठी नागरिकांना वारंवार शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागत असून, वेळ आणि पैशांचा अपव्यय होत आहे.

जन्म किंवा मृत्यूची नोंद वेळेत न झाल्यास नागरिकांना विविध शासकीय योजना, वारसा हक्क, शैक्षणिक तसेच इतर प्रशासकीय कामांसाठी आवश्यक कागदपत्रे मिळविताना अडचणी निर्माण होतात. त्यामुळे प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करणे गरजेचे असल्याचे बांगर यांनी म्हटले आहे.

दंडाधिकाऱ्यांना निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे प्रलंबित प्रकरणांवर योग्य ती कार्यवाही करून नागरिकांना दिलासा द्यावा. पुढील आदेश येईपर्यंत संबंधित प्रक्रिया सुरू ठेवण्याबाबतही प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी श्रीराम बांगर यांनी केली.

जन्म-मृत्यू नोंदणीची प्रकरणे वेळेत पूर्ण झाल्यास नागरिकांना आवश्यक दाखले व कागदपत्रे मिळण्यास मदत होईल. तसेच नोंदणी प्रक्रियेतील अचूकता, पारदर्शकता आणि विश्वासार्हता वाढण्यास हातभार लागेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## टोमॅटोचे भाव घसरले; उत्पादन खर्चही निघेना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी । प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लाखणगाव, पोंदेवाडी, जारकरवाडी तसेच धामणी येथील जाधवमळा परिसरात यंदाही शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात टोमॅटोची लागवड केली. मात्र, सध्या टोमॅटोच्या बाजारभावात मोठी घसरण झाल्याने उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून, तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

यंदा टोमॅटो उत्पादकांना सुरुवातीपासूनच अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. धामणी येथील जाधवमळ्यातील टोमॅटो उत्पादक शेतकरी डॉ. गणेश बढेकर यांनी सांगितले की, चालू हंगामात टोमॅटोची रोपेच खराब निघाल्याने पुन्हा लागवड करावी लागली. त्यामुळे लागवडीचा खर्च दुप्पट झाला. खराब रोपांमुळे उत्पादनातही सुमारे निम्म्याने घट झाली. त्यातच बाजारभाव घसरल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट निर्माण झाले आहे.



सध्या नारायणगाव बाजार समितीतील बाजारात टोमॅटोला एका कॅरेटला सुमारे ३०० ते ३५० रुपये भाव मिळत आहे. त्यानुसार शेतकऱ्यांना किलोमागे केवळ १५ ते १६ रुपये मिळत आहेत. उत्पादनासाठी लागणारा रोपांचा खर्च, लागवड, खते, औषधे, मजुरी, पाणी, वाहतूक आणि तोडणीचा खर्च लक्षात घेता मिळणारा बाजारभाव अत्यंत कमी असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

यंदा खराब रोपांमुळे उत्पादन घटले असतानाच बाजारभावही कमी झाल्याने दुहेरी फटका बसला आहे. त्यामुळे केलेला भांडवली खर्च तरी वसूल होईल का, असा प्रश्न टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे.

टोमॅटोचे उत्पादन घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च आणि मेहनत करावी लागते. मात्र, बाजारात आवक वाढली किंवा मागणी कमी झाली की दरात अचानक घसरण होते. त्यामुळे उत्पादन चांगले असतानाही शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. बाजारभावातील ही अनिश्चितता टोमॅटो उत्पादकांसाठी कायमची डोकेदुखी ठरत आहे.

शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या तुलनेत योग्य दर मिळावा, बाजारभावातील चढ-उतारांपासून संरक्षण मिळावे आणि बाजारव्यवस्थेत पारदर्शकता आणावी, अशी मागणी उत्पादकांकडून होत आहे.

उत्पादन खर्च वाढला, उत्पादन घटले आणि बाजारभावही कोसळला; त्यामुळे टोमॅटो उत्पादक शेतकरी यंदा 'शेती करायची तरी कशी?' या प्रश्नापुढे उभा ठाकला आहे.

# थोरांदळे शाळेचा शैक्षणिक गुणवत्तेत मानाचा तुरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी : प्रतिनिधी

थोरांदळे (ता. आंबेगाव) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा, थोरांदळे येथील विद्यार्थ्यांनी उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. इयत्ता सातवीतील विद्यार्थी आदित्य संजय परदेशी याने २८० गुण मिळवत राज्य गुणवत्ता यादीत सातवा क्रमांक पटकावला. तसेच शाळेतील सात विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळविले.



या उल्लेखनीय कामगिरीबद्दल आंबेगाव तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत गुणवंत विद्यार्थ्यांसह मार्गदर्शक शिक्षकांचा शाल व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. जिल्हा परिषद पुणेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील आणि आंबेगाव पंचायत समितीचे सभापती कैलासबुवा काळे यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला.

जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये रुद्र भाऊसाहेब वाळुंज (२७० गुण), यज्ञेश अविनाश मिंडे (२५४), मान्यता मनोज लोखंडे (२५०), आर्या नितीन टेमगिरे (२४४), आरुष मनोज शिंदे (२४२), श्वेता अनिल गुंड (२३८) आणि रुतेश गणेश निकम (२३६) यांचा समावेश आहे.

या गुणवंत विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका कमल संतोष थोरात, राज्य आदर्श पुरस्कारप्राप्त शिक्षक बाळासाहेब कानडे, तसेच शैला थोरात, विनायक पडवळ, विजय डोके, मिलिंद चिखले, श्वेता चिखले, संदीप शिंदे, अनिकेत आवटे आणि मंगल वाघ यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक हेमराज भद्राणे, आंबेगाव तालुका प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचे सभापती कान्होबा डोंगरे, पदवीधर शिक्षक संघटनेच्या मिनाक्षी वळसे, ज्ञानलक्ष्मी प्रतिष्ठानच्या मनिषा कानडे, साने गुरुजी कथामाला माजी राज्याध्यक्ष शामराव कराळे, सचिव चांगदेव पडवळ, कार्यवाह संतोष गडगे, सदस्य विकास कानडे, संतोष कानडे, संतोष थोरात, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, ग्रामपंचायत थोरांदळे तसेच पालकवर्गाने विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत राज्य आणि जिल्हा स्तरावरील गुणवत्ता यादीत मिळविलेले हे यश त्यांच्या मेहनतीसोबतच शिक्षकांचे प्रभावी मार्गदर्शन आणि पालकांच्या प्रोत्साहनाचे फलित मानले जात आहे. या यशामुळे थोरांदळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## पुण्याच्या वाहतूक व्यवस्थेचे पुढील ५० वर्षांचे नियोजन करा : मुरलीधर मोहोळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहराची वाढती लोकसंख्या आणि वाहनांची झपाट्याने वाढणारी संख्या लक्षात घेता, शहराच्या वाहतूक व्यवस्थेचे पुढील ५० वर्षे डोळ्यासमोर ठेवून दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक आहे. मेट्रो विस्तार, बससेवा, रिंग रोड, मिसिंग लिंक, पूल आणि विविध रस्ते प्रकल्प यांचा एकात्मिक विचार करून वाहतूक व्यवस्थेचा आराखडा तयार करावा, अशी मागणी केंद्रीय राज्यमंत्री व पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी केली.

पुण्याच्या भविष्यातील वाहतूक व्यवस्थेबाबत बोलताना मोहोळ यांनी शहराच्या वाढत्या गरजांनुसार पायाभूत सुविधांचे नियोजन करण्यावर भर दिला. केवळ सध्याच्या वाहतूक कोंडीवर उपाय करण्याऐवजी भविष्यातील लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि शहराचा विस्तार लक्षात घेऊन दीर्घकालीन उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पुणे आणि परिसरातील वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी मेट्रोचे जाळे अधिक विस्तारित करण्याबरोबरच सार्वजनिक बससेवा सक्षम करणे आवश्यक आहे. नागरिकांना सार्वजनिक वाहतुकीचे अधिक पर्याय उपलब्ध झाल्यास खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे मेट्रो आणि बससेवेचा परस्पर समन्वय साधून वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करण्याची गरज आहे.

शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी रिंग रोड, रखडलेल्या किंवा अपूर्ण 'मिसिंग लिंक', नवीन पूल तसेच आवश्यक रस्ते प्रकल्पांना गती देणेही महत्त्वाचे आहे. शहराच्या विविध भागांना जोडणारे पर्यायी मार्ग विकसित केल्यास प्रमुख रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण कमी करता येईल.

पुण्याची वाढ आता शहराच्या पारंपरिक हद्दीपुरती मर्यादित राहिलेली नसून महानगर परिसरातही मोठ्या प्रमाणावर विस्तार होत आहे. त्यामुळे शहर आणि परिसरातील वाहतूक व्यवस्थेचा एकत्रित विचार करून प्रकल्पांची आखणी करण्याची आवश्यकता आहे.

'आजची कोंडी सोडवण्याबरोबरच पुढील पिढ्यांसाठी वाहतूक व्यवस्था उभी करणे आवश्यक आहे,' या भूमिकेतून मेट्रो, बस, रिंग रोड, पूल, मिसिंग लिंक आणि रस्ते प्रकल्प यांचे एकात्मिक नियोजन करण्यावर मोहोळ यांनी भर दिला. पुढील ५० वर्षांचा विचार करून उभारलेली सक्षम वाहतूक व्यवस्था पुण्याच्या भविष्यातील विकासासाठी महत्त्वाची ठरणार आहे.

# अवसरी खुर्दच्या विकासकामांसाठी निधी कमी पडू देणार नाही : खासदार डॉ. अमोल कोल्हे

■ दैनिक राज्य लोकतंत्र


मंचर । प्रतिनिधी

अवसरी खुर्द (ता. आंबेगाव) गावाने दोन वेळा मतदानरूपी आशीर्वाद देऊन संसदेत खासदार म्हणून जाण्याची संधी दिली. या ऋणाची उतराई म्हणून गावातील विकासकामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी दिली.

अवसरी खुर्द येथील टेमकर मळा परिसरातील देवीआई मंदिराच्या प्रांगणात संरक्षण भिंत, पेव्हिंग ब्लॉक आणि स्वच्छतागृहाच्या कामाच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते.

अवसरी खुर्द येथे पुरातन जागृत देवीआई माता मंदिर आहे. आषाढ महिन्यात महिला भाविक मोठ्या संख्येने देवीला नैवेद्य व नारळ अर्पण करण्यासाठी येतात. तसेच दरवर्षी शाकंभरी पौर्णिमेनिमित्त हजारो भाविकांच्या उपस्थितीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते.

टेमकर परिवार व भाविकांच्या मागणीनुसार खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या खासदार निधीतून १० लाख रुपये खर्चून मंदिर परिसरात संरक्षक भिंत व पेव्हिंग ब्लॉक बसविण्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून स्वच्छ भारत मिशनअंतर्गत ३ लाख रुपयांच्या निधीतून स्वच्छतागृह उभारणी, तसेच निसर्ग प्रतिष्ठानच्या वतीने वृक्षारोपणाचा शुभारंभही करण्यात आला. या कामांचा प्रारंभ खासदार डॉ. अमोल कोल्हे व प्रशासक सरपंच प्रसाद कराळे यांच्या हस्ते झाला.



यावेळी डॉ. कोल्हे यांनी अवसरी खुर्द येथील श्री भैरवनाथ विद्यालयासाठी 'सावित्रीच्या लेकीं'च्या मागणीनुसार स्कूल बस उपलब्ध करून देण्यासाठी तसेच देवीआई मंदिरासमोर प्रशस्त सभामंडप उभारण्यासाठी लवकरच निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

श्री गुरुदेव बिल्डर्सचे प्रदीप टेमकर यांनी मंदिर परिसराच्या सुशोभीकरणासाठी वैयक्तिक जागा देण्याची घोषणा केली. सेवानिवृत्त पोलीस अधिकारी भरत टेमकर यांनी मंदिर प्रांगणात विठ्ठलाची पूर्णाकृती मूर्ती उभारण्याचे जाहीर केले. संदिप टेमकर यांनी मुरूम व मातीचा भराव करून देण्याचे सांगितले.

कार्यक्रमास शिवसेना पुणे जिल्हा संपर्कप्रमुख सुरेश भोर, पंचायत समिती सदस्य निलेश टेमकर, कल्याण आबा शिंदे, शिवसेना शहरप्रमुख (उभाठा) प्रविण टेमकर, राजू परदेशी, संजय वायाळ, धनेश टेमकर, उद्योजक गणपत टेमकर, विवेक टेमकर, माजी व ग्रामस्त अधिकारी उपस्थित होते.

प्रविण टेमकर यांनी प्रास्ताविक केले, तर सुभाष टेमकर यांनी आभार मानले.

## कदमवाकवस्तीतील अधिकृत नसलेल्या ५ मजली इमारतीवर पीएमआरडीएकडून मोठी कारवाई

■ पुणे : प्रतिनिधी

**कदमवाकवस्ती (ता. हवेली):** येथील एमआयटी कॉर्नर जवळील एका अनधिकृत पाच मजली इमारतीवर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (झचठ्ठअ) धडक कारवाई करत ती जमीनदोस्त केली आहे. या कारवाईमुळे कदमवाकवस्ती परिसरात प्रचंड खळबळबळ उडाली आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, कदमवाकवस्तीच्या इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी आणि धडक कारवाई मानली जात आहे.५० पोलिसांचा कडक बंदोबस्त१९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास झचठ्ठअ च्या पथकाने या अनधिकृत बांधकामावर हातोडा चालवण्यास सुरुवात केली. कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या वतीने सुमारे ५० पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप पवार आणि क्राईम विभागाचे पोलीस निरीक्षक नंदकुमार कोळी यांच्या थेट उपस्थितीत हा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.महिलांचा विरोध आणि तणावकारवाई सुरू असताना काही महिलांनी प्रशासकीय पथकाला तीव्र विरोध दर्शवत गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. यामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप पवार यांनी अत्यंत संवेदनशीलतेने परिस्थिती हाताळत परिस्थितीवर नियंत्रण मिळवले आणि कायदा व सुव्यवस्था राखली. त्यानंतर प्रशासनाने अनधिकृत इमारत पाडण्याचे काम पूर्ण केले. इतर अनधिकृत बांधकामे रडारवर?ही मोठी कारवाई पाहण्यासाठी परिसरात नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. कदमवाकवस्ती भागात यापूर्वी झालेल्या कारवायांच्या तुलनेत ही कारवाई अत्यंत मोठ्या प्रमाणावर झाल्याची चर्चा स्थानिकांमध्ये रंगली आहे. या धडक कारवाईनंतर आता कदमवाकवस्ती परिसरातील इतर अनधिकृत बांधकामांवरही झचठ्ठअ चा हातोडा चालणार का? याकडे सर्व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## सारांश वृत्त

### लाईट गेली तरी १० तास चालणार पंखा...! नवा इडृउ फॅन लाँच, कोणत्या कंपनीने आणला असेल बरे...

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे : प्रतिनिधी

उन्हाळा या, पावसाळ्याच्या दिवसांत सतत खंडित होणारा वीजपुरवठा आणि व्होल्टेजमधील चढ-उतार यांमुळे नागरिक हैराण होतात. यावेळी अनेकांना इन्व्हर्टर असावा असे वाटू लागते. परंतू, त्यासाठी तीस-चाळीस हजार रुपये आणि जागाही जाते. आता तीन-चार तास चालणारे चार्जिंगवाले बल्ब तर आले आहेत, परंतू वीज गेली तरी काही तास चालू शकेल असा फॅन, एसी आदी काही आले नव्हते. परंतू, आता ते देखील प्रत्यक्षात येऊ लागले आहे. लाईट गेल्यावर १० तास चालू शकेल असा फॅन बाजारात आला आहे.

ओरिएंट इलेक्ट्रिकने बाजारात 'एलेींशलह तेश्रीं' हा नवा सीलिंग फॅन लाँच केला आहे. या पंख्यामध्ये इनबिल्ट रिचार्जेबल बॅटरी देण्यात आली असून, वीज नसतानाही हा पंखा इन्व्हर्टरशिवाय सलग १० तास हवा देऊ शकतो. या पंख्याची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्याची इनबिल्ट बॅटरी शिवाय बीएलडीसी. वीज गेल्यानंतर हा फॅन १० तासांपर्यंत बॅटरीवर अखंड चालतो. कंपनीच्या दाव्यानुसार, ५०० चार्जिंग सायकलनंतरही ही बॅटरी ८० टक्क्यांपर्यंत कार्यक्षमता टिकवून ठेवते.

यामध्ये २८थ ची प्रगत इडृउ मोटर वापरण्यात आली आहे. पारंपारिक इंडक्शन मोटरच्या तुलनेत हा पंखा ५० टक्क्यांपर्यंत विजेची बचत करतो. हा फॅन १२०त ते २८०त या व्होल्टेज रेंजवर चालण्यास सक्षम आहे. त्यामुळे व्होल्टेज कमी-जास्त होत असलेल्या भागातही तो सुरळीत काम करतो. यामध्ये डबल बॉल-बेअरिंग असेंब्ली देण्यात आली आहे.

# युद्धाचा धूर, इंधनाचा नफा! अमेरिका-भारताच्या तेल कंपन्यांची मात्र चांदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

न्यूयॉर्क : इराण आणि युक्रेनमधील युद्धामुळे जगभरातील इंधनपुरवठा विस्कळीत झाला असताना त्याचा सर्वाधिक फटका सामान्य ग्राहकांना बसत आहे; मात्र या पुरवठा-अनिश्चिततेत काही देशांच्या तेलशुद्धीकरण कंपन्यांसाठी प्रचंड नफ्याची संधी निर्माण झाली आहे. भारत आणि अमेरिकेतील तेलशुद्धीकरण कंपन्या वाढलेल्या मागणीचा फायदा घेत इंधनाची निर्यात वाढवत असून, युद्ध जितके लांबेल तितका हा नफ्याचा खेळ अधिक रंगण्याची शक्यता आहे.



युद्धामुळे मध्यपूर्व आणि रशियातून होणारा पारंपरिक इंधनपुरवठा अडचणीत आला आहे. जहाजांवरील हल्ले, वाहतूक अडथळे आणि पुरवठा मार्गांवरील अनिश्चिततेमुळे अनेक आयातदार देशांना देशांतर्गत इंधनटंचाई टाळण्यासाठी अधिक दर मोजून इंधन खरेदी करावे लागत आहे. म्हणजेच युद्धभूमी हजारो किलोमीटर दूर असली, तरी त्याची किंमत पेट्रोलपंपावर आणि अर्थव्यवस्थेवर थेट पोहोचत आहे.

या परिस्थितीत भारत आणि अमेरिकेतील तेलशुद्धीकरण कंपन्यांनी निर्यातीचा वेग वाढवला आहे. उत्तर गोलार्धात उन्हाळ्यात वाहनांच्या इंधनाची मागणी वाढलेली असतानाच पुरवठा कमी पडल्याने आयातदार देश मोठा अधिभार देऊन इंधन खरेदी करत आहेत. परिणामी निर्यातदार कंपन्यांच्या नफ्यात वाढ होत आहे.

अमेरिकेच्या स्वच्छ पेट्रोलियम उत्पादनांच्या जुलै महिन्यातील निर्यातीने विक्रमी पातळी गाठल्याचे केप्लरच्या आकडेवारीतून दिसते. भारतातील निर्यातदार कंपन्यांनाही या परिस्थितीचा फायदा होत आहे. मात्र चीन आणि अमेरिकेतील कंपन्यांशी त्यांना कडवी स्पर्धा करावी लागत आहे.

इथेच खरा विरोधाभास दिसतो. युद्धामुळे जागतिक बाजारपेठेत इंधनाचा तुटवडा निर्माण होतो, ग्राहकांना महागाईचा फटका बसतो; आणि त्याच वेळी काही तेल कंपन्यांसाठी तोच तुटवडा अब्जावधी डॉलरच्या कमाईची संधी बनतो.

म्हणजे युद्धाचा धूर कुणासाठी संकट घेऊन येतो, तर कुणासाठी नफ्याची सोन्याची खाण उघडतो. प्रश्न एवढाचया वाढत्या नफ्याचा फायदा ग्राहकांना कधी मिळणार?

## आदिवासींच्या जमिनीवर विकासाचा बुलडोझर? केन-बेतवा प्रकल्पाविरोधात राहुल गांधी मैदानात!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
केन : प्रतिनिधी

बेतवा नदीजोड प्रकल्पाच्या विरोधात आदिवासी समाजाने पुकारलेल्या सत्याग्रहाला आता थेट राजकीय पाठबळ मिळाले आहे. काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बुधवारी, १९ ऑगस्ट रोजी, या आंदोलनाला पाठिंबा देत सरकारवर दबाव आणण्याचा इशारा दिला. प्रकल्पामुळे प्रभावित झालेल्या आदिवासींच्या शिष्टमंडळाची नुकतीच भेट घेतल्याचा व्हिडिओ त्यांनी समाजमाध्यमांवर प्रसिद्ध केला.

राहुल गांधी यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, या लढ्यात आमचे आदिवासी भाऊ-बहिणी एकटे नाहीत; काँग्रेस आणि मी त्यांच्या सोबत आहोत. एवढ्यावर न थांबता आंदोलनस्थळी स्वतः भेट देऊन सरकारवर दबाव आणण्याची घोषणाही त्यांनी केली आहे.

मात्र या प्रकरणाचा खरा प्रश्न केवळ काँग्रेस विरुद्ध सरकार असा नाही. प्रश्न आहे तो विकासाच्या नावाखाली विस्थापित होणाऱ्या आदिवासींच्या हक्कांचा. नदीजोड प्रकल्पातून पाणी, सिंचन आणि विकासाची मोठी आश्वासने दिली जात असली, तरी ज्यांच्या जमिनी आणि जीवनपद्धतीवर त्याचा थेट परिणाम होणार आहे, त्यांचा आवाज किती गांभीर्याने ऐकला जातोय, हा मूलभूत सवाल आहे.

सरकारसाठी हा प्रकल्प विकासाचे प्रतीक असू शकतो; मात्र प्रभावित आदिवासींसाठी तो त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न बनत असेल, तर केवळ आकडे आणि प्रकल्प अहवाल पुरेसे ठरणार नाहीत. पुनर्वसन, भरपाई, पर्यावरणीय परिणाम आणि स्थानिकांची संमती याबाबत सरकारने पारदर्शक भूमिका मांडणे आवश्यक आहे. राहुल गांधींच्या या भूमिकेमुळे केन-बेतवा प्रकल्पाचा मुद्दा आता संसदेबाहेरून थेट राष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी येण्याची शक्यता आहे. सरकारसमोर त्यामुळे दुहेरी आव्हान आहेप्रकल्प पुढे नेणे आणि त्याचवेळी आदिवासींचा विरोध शांत करण्याऐवजी त्यांचा विश्वास जिंकणे.

## सर्वोच्च न्यायालयातील वकिलांचा कौल प्रदीप राय यांच्या बाजूने; बार असोसिएशनच्या अध्यक्षपदावर निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली । प्रतिनिधी

सर्वोच्च न्यायालयातील वकिलांची महत्त्वाची संघटना असलेल्या सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ अधिवक्ता प्रदीप राय यांची निवड झाली आहे. मंगळवार, १८ ऑगस्ट २०२६ रोजी निवडणूक पार पडली आणि त्याच रात्री उशिरा निकाल जाहीर करण्यात आला.

अध्यक्षपदाच्या निवडणुकीत प्रदीप राय यांच्यासह एकूण सात उमेदवार मैदानात होते. अनुपम लाल दास, आदिश अग्रवाला, गौरव भाटिया, सुकुमार पट्टजोशी, सिद्धार्थ मृदुल आणि महालक्ष्मी पवनी यांनीही अध्यक्षपदासाठी निवडणूक लढवली.

मतांच्या आकडेवारीवर नजर टाकली तर अनुपम लाल दास यांना ४५१ मते, आदिश अग्रवाला यांना ४१२ मते, गौरव भाटिया यांना ३७० मते, सुकुमार पट्टजोशी यांना २६९ मते, सिद्धार्थ मृदुल यांना २१७ मते, तर महालक्ष्मी पवनी यांना १२८ मते मिळाली.

या निवडणुकीचा निकाल केवळ सर्वोच्च न्यायालयातील वकिलांच्या संघटनेपुरता मर्यादित नाही. सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशन ही न्यायव्यवस्थेतील अत्यंत प्रभावशाली संस्था मानली जाते. त्यामुळे तिच्या अध्यक्षपदावर कोणाची निवड होते, याकडे कायदेवर्तुळाचे विशेष लक्ष असते.

न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य, वकिलांचे व्यावसायिक प्रश्न, न्यायालयीन प्रशासन, बार आणि न्यायपीठ यांच्यातील संबंध तसेच न्यायव्यवस्थेतील पारदर्शकता यांसारखे मुद्दे नव्या अध्यक्षांसमोर महत्त्वाचे असतील.

विशेष म्हणजे, सर्वोच्च न्यायालयात न्यायव्यवस्था आणि केंद्र सरकार यांच्यातील अधिकारसंबंध, न्यायाधीशांच्या नियुक्त्या, न्यायालयीन सुधारणांसह अनेक संवेदनशील विषयांवर सातत्याने चर्चा सुरू असताना प्रदीप राय यांची निवड झाली आहे.

## यूजीसी-नेटची फेरपरीक्षा; राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

राष्ट्रीय पात्रता परीक्षेच्या जून २०२६ सत्रातील प्रश्नपत्रिकांमध्ये त्रुटी आढळल्याने राष्ट्रीय चाचणी संस्थेला पुन्हा परीक्षा घेण्याची नामुष्की ओढवली आहे. केंद्र सरकारने बुधवारी, १९ ऑगस्ट रोजी दिल्ली उच्च न्यायालयाला याबाबत माहिती दिली. इंग्रजी आणि वाणिज्य विषयांची फेरपरीक्षा ९ सप्टेंबरला, तर समाजशास्त्र विषयाची परीक्षा १० सप्टेंबरला होणार आहे.

प्रश्नपत्रिकांमध्ये चुका झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर फेरपरीक्षेचा निर्णय घेण्यात आला. मात्र, प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून परीक्षा घेण्यापर्यंत संपूर्ण यंत्रणा कार्यरत असताना अशा गंभीर त्रुटी नेमक्या कशा घडल्या, हा प्रश्न आता अधिक महत्त्वाचा ठरला आहे. प्रत्येक वेळी परीक्षेतील गोंधळाचा फटका विद्यार्थ्यांनाच बसतो आणि व्यवस्थेची जबाबदारी मात्र धूसरच राहते.

राष्ट्रीय पात्रता परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षण आणि शैक्षणिक कारकिर्दीशी थेट जोडलेली महत्त्वाची परीक्षा आहे. हजारो विद्यार्थी महिनोन्महिने तयारी करतात, आर्थिक खर्च करतात आणि आपल्या भवितव्याचे नियोजन करतात. त्यानंतर प्रश्नपत्रिकेतील त्रुटींमुळे पुन्हा परीक्षा द्यावी लागणे म्हणजे त्यांच्या वेळेचा, मेहनतीचा आणि मानसिक तयारीचा अपव्यय आहे.




राष्ट्रीय चाचणी संस्थेकडून परीक्षा व्यवस्था अधिक सक्षम, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्याचे दावे केले जातात. मग त्याच व्यवस्थेत वारंवार प्रश्नपत्रिकांमध्ये त्रुटी कशा राहतात? परीक्षा घेणारी यंत्रणा विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळत असेल, तर तिच्या कार्यपद्धतीची जबाबदारी निश्चित करण्याची वेळ आली आहे.

विद्यार्थ्यांना केवळ फेरपरीक्षेची तारीख नको आहे; त्यांना चूक कुणाची आणि जबाबदारी कुणाची? याचे स्पष्ट उत्तर हवे आहे. परीक्षा व्यवस्थेतील निष्काळजीपणाची किंमत विद्यार्थ्यांनीच का मोजायची, हा सवाल आता केंद्र सरकार आणि राष्ट्रीय चाचणी संस्थेला टाळता येणार नाही.

# मोदी कॅबिनेटचे ५ मोठे निर्णय; हायवे, ४ रेल्वे मार्गांना मंजुरी, १३ हजार कोटींच्या प्रकल्पांवर मोहर!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत पायाभूत सुविधांच्या विकासासाठी १३०४१ कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. यात, बिहारमधील चार पदरी महामार्ग आणि पश्चिम बंगाल, ओडिशा, आंध्र प्रदेश व तामिळनाडू राज्यांमधील ४ महत्त्वाच्या रेल्वे मार्गांचा समावेश आहे. यासंदर्भात, केंद्रीय रेल्वे आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी माहिती दिली.

पत्रकार परिषदेत बोलताना वैष्णव म्हणाले, सरकारने एकूण १३,०४१ कोटी रुपयांचे चार रेल्वे मार्ग आणि एका चार पदरी महामार्गाच्या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. मोदी मंत्रिमंडळाने ३,५९१ कोटी रुपये खर्चाच्या मुझफ्फरपूर-सीतामढी-सोनवर्षा या चार पदरी महामार्गाच्या बांधकामाला मंजुरी दिली आहे. देशातील रेल्वे नेटवर्कमध्ये एकूण ७ मुख्य ट्रंक रूट्स आहेत. यात दिल्ली-हावडा, हावडा-चेन्नई, चेन्नई-मुंबई, मुंबई-दिल्ली, दिल्ली ते चेन्नई आणि मुंबई ते हावडा या रेल्वेमार्गांचा, तसेच गुवाहाटीकडे जाणाऱ्या ईशान्य मार्गाचा समावेश आहे. यापैकी हावडा-चेन्नई मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याला पूर्णपणे चार पदरी करण्याची योजना आहे.



बिहारमध्ये ४ पदरी महामार्ग -

मुझफ्फरपूर - सीतामढी - सोनवर्षा या ८२.६ किमी लांबीच्या राष्ट्रीय महामार्गाचे ४ पदरीकरणात रूपांतर केले जाणार आहे. यामुळे भारत-नेपाळ सीमेवरील व्यापार आणि वाहतूक अदिक भक्कम होईल. या प्रकल्पासाठी ३,५९१ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

हावडा - चेन्नई रेल्वे मार्गाचे ४ पदरीकरण -

पश्चिम बंगाल आणि ओडिशादरम्यानच्या खरगपूर-भद्रक या १७३ किमी च्या प्रकल्पाला ३,३५२ कोटी रुपये खर्च केले जातील. या मार्गावर ४१ मोठे आणि १६९ छोटे पूल बांधले जाणार आहेत. भद्रक ते हरिदासपूर या ७५ किमी च्या चौथ्या लाईन प्रकल्पासाठी १,५३३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. गुम्मिडीपुंडी ते गुदूर या ९० किमी आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूच्या सीमेवरील या डबल लाईन मार्गाचे तिसऱ्या आणि चौथ्या लाईनच्या विस्तारासाठी २२२९ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. याशिवाय, ओडिशातील पारादीप पोर्ट आणि कटक दरम्यान तिसऱ्या आणि चौथ्या लाईनचे बांधकाम करण्यात येणार आहे. यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती तर होईलच, शिवाय देशाच्या वार्षिक लॉजिस्टिक्स खर्चात शेकडो कोटी रुपयांची बचत होईल.

## ३० हजार आंदोलकांचा हिशेब आहे; ५ हजार पोलिसांचा हिशेब आहे; मग गैरवर्तनाचा हिशेब कुठे?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

नवी दिल्ली : दिल्ली पोलिसांचे ४२ पानी प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयात दाखल झाले आणि त्यातून आकड्यांची जणू परेडच समोर आली. २० जुलै २०२६ रोजीच्या विद्यार्थी आंदोलनात किती आंदोलक होते, किती पोलीस होते, किती महिला पोलीस तैनात होत्या, किती पोलीस जखमी झाले, किती आंदोलक जखमी झाले आणि किती अडथळे उभारण्यात आलेसगळ्याचा तपशील पोलिसांनी दिला आहे. मात्र एक महत्त्वाचा हिशेब अजूनही अपुरा आहेपोलिसांच्या कारवाईत गैरवर्तन झाले असेल, तर त्याची जबाबदारी नेमकी कोणाची?

१७ ऑगस्ट २०२६ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास दाखल झालेल्या या प्रतिज्ञापत्रानुसार, २० जुलैला एका टप्प्यावर ३० हजारांहून अधिक आंदोलकांसमोर केवळ ५ हजार गणवेशधारी पोलीस कर्मचारी तैनात होते. म्हणजे जवळपास सहा आंदोलकांमागे एक पोलीस कर्मचारी. परिस्थिती किती मोठी होती, हे दाखवण्यासाठी हा आकडा पोलिसांनी न्यायालयासमोर ठेवला आहे. पोलिसांनी कारवाईचे समर्थन करताना आंदोलन हिंसक झाल्याचे आणि संसद परिसरातील महत्त्वाच्या सरकारी सुविधांचे संरक्षण करणे आवश्यक असल्याचेही सांगितले आहे.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आंदोलनादरम्यान २४० हून अधिक पोलीस कर्मचारी जखमी झाले, त्यात महिला पोलीस अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. दुसरीकडे सुमारे २१८ आंदोलक जखमी झाले आणि त्यांच्यावर उपचार करण्यात आले. म्हणजे पोलिसांकडे जखमींचीही आकडेवारी आहे. पण महिला विद्यार्थी आणि आंदोलकांशी झालेल्या गैरवर्तनाच्या तक्रारींची चौकशी कुठे पोहोचली, याचा स्पष्ट हिशेब मात्र प्रश्नचिन्हात आहे.

आणि इथेच या संपूर्ण प्रकरणातील सर्वात मोठा विरोधाभास दिसतो.

३० हजार आंदोलकांचा आकडा आहे. ५ हजार पोलिसांचा आकडा आहे. २४० जखमी पोलिसांचा आकडा आहे. २१८ जखमी आंदोलकांचाही आकडा आहे. मग किती अधिकाऱ्यांची चौकशी झाली, किती अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई झाली आणि किती जणांना जबाबदार धरलेयाचा आकडा कुठे आहे?

पोलिसांनी सर्वोच्च न्यायालयात कमीत कमी आवश्यक बळ आणि जास्तीत जास्त संयम वापरल्याचे म्हटले आहे. पण संयमाचा दावा करणे आणि त्या संयमाची स्वतंत्र तपासणी होणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. सर्वोच्च न्यायालयानेही पोलिसांच्या कारवाईची स्वतंत्र तपासणी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचे संकेत दिले आहेत. या समितीसमोर २० जुलैच्या घटनांचे दृश्यचित्रण, सीसीटीव्ही चित्रफिती आणि महिला आंदोलकांशी गैरवर्तनाच्या आरोपांचीही तपासणी होणार आहे.

पण या सगळ्यात केंद्रीय गृह मंत्रालयाची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. दिल्ली पोलीस केंद्रीय गृह मंत्रालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली काम करतात. त्यामुळे हा प्रश्न केवळ दिल्ली पोलिसांचा राहात नाही. गृह मंत्रालयाने पोलिसांच्या कारवाईवर स्वतंत्र देखरेख ठेवली का? वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून अहवाल मागवला का? विद्यार्थ्यांशी आणि विशेषतः महिला आंदोलकांशी झालेल्या वर्तनाची विभागीय चौकशी केली का? दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी मंत्रालयाने कोणती पावले उचलली? या प्रश्नांची उत्तरेही देशाला मिळायला हवीत.

कारण सरकारने आंदोलनातील विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल केले असतील, तर त्या कारवाईचा हिशेब सरकारकडे असायलाच हवा. पण त्याच वेळी सरकारी यंत्रणेने केलेल्या कारवाईचाही हिशेब सरकारनेच द्यायला हवा. आंदोलकांनी कायदा मोडला असेल तर कायद्यानुसार कारवाई झालीच पाहिजे. संसदेकडे जाणारा मार्ग अडवला असेल, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केले असेल किंवा पोलिसांवर हल्ला केला असेल, तर त्याची चौकशी आणि कारवाई आवश्यक आहे. पण त्याच न्यायाच्या तराजूत वर्दीतील अधिकाराचा गैरवापर झाला असेल तर त्याचीही चौकशी झाली पाहिजे. ३० हजार आंदोलक विरुद्ध ५ हजार पोलीस हा परिस्थितीचा आकडा आहे; तो कोणत्याही गैरवर्तनासाठी ढाल नाही.

आता सर्वोच्च न्यायालयासमोरचा खरा सवाल एवढाच नाही की २० जुलैला नेमके काय झाले? सवाल त्याहून मोठा आहेआंदोलकांची जबाबदारी ठरवताना पोलिसांची जबाबदारी कोण ठरवणार? आणि पोलिसांची जबाबदारी ठरवताना केंद्रीय गृह मंत्रालय स्वतःची जबाबदारी स्वीकारणार का?

कारण लोकशाहीत आंदोलकांकडून उत्तरदायित्व अपेक्षित असेल, तर सत्तेच्या वर्दीलाही उत्तरदायित्वापासून सूट देता येणार नाही.